# // प्रेसनोट //

## दि. २५/०६/२०२२

## दि. २६/०६/२०२२ रोजीचे लसीकरण सत्र नियोजन

कोविड-१९ महामारीच्या प्रतिबंधासाठी दि. १६ जानेवारी २०२१ पासून संपूर्ण देशात व त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या आदेशान्वये मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात टप्पाटप्प्याने कोविड-१९ लसीकरण सत्रांचे नियोजन खालील नमूद वयोगट निहाय करण्यात येत आहे.

आतापर्यंत १५ वर्षावरील नागरिकांचे प्रथम डोस / दुसरा डोसकरीताचे तसेच ६० वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांना दुसरा डोस घेतल्या नंतर ९ महिने (३९ आठवडे) पूर्ण झाले असल्यास प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) करीताचे लसीकरण सुरु होते. परंतु, या पुढे ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांचे दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे) पूर्ण झाले असल्यास प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) करीताचे लसीकरण केले जाईल. तसेच वय वर्षे १४ ते १५ या वयोगटातील लाभार्थ्यां करीता कोवॅक्सीन लस देय राहील.

- दि.०९/०४/२०२२ रोजीच्या केंद्रशासनाच्या परिपत्रकातील निर्देशानुसार १८ वर्षा वरील नागरिकांकरिता खाजगी कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झाले असल्यास बुस्टर डोस देय राहील.
- दि.२६/०६/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कोविड लसीकरण केंद्र बंद राहतील.
- तरी कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी नागरीकांनी नाहक गरदी करु नये.
- शासना मार्फत प्राप्त होणाऱ्या लस साठाच्या उपलब्धे नुसार पुढील लसीकरण सत्राचे नियोजन करण्यात येईल. तरी महानगरपालिकेस सहकार्य करणे करीता मा. श्रीम. ज्योत्सना हसनाळे, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका व मा. श्री. दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या मार्फत मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
वैद्यकीय विभाग
लसीकरण सत्र नियोजन - 26.06.2022
तक्ता क्र. 1

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| NO SESSION | | | | | | | | |

* उद्या दि. २६.०६.२०२२ रोजी शासकीय कोविड लसीकरण केंद्र बंद राहतील.

* शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या लससाठ्याच्या उपलब्धतेनुसार पुढील लसीकरण सत्राचे नियोजन करण्यात येईल याची नोंद नागरिकांनी घेण्यात यावी.